Annexure - 12

(12)

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
जावक क्रमांक : मआ/ ४१०0
दिनांक : १५.१० १९९९.

# परिपत्रक

विषय : विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट, इगतपुरी, या संस्थेच्या 'विपश्यना' ह्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांबाबत.

विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट, इगतपुरी, जिल्हा - नाशिक या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील प्रशिक्षण केंद्रात 'विपश्यना' हे १० दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. महापालिका आयुक्त यांच्या आदेश क्रमांक : मआ/४६९, दिनांक १५.१०.१९९९ अन्वये हे प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांना खालील नमूद केलेल्या शर्तींच्या अधीन राहून प्रशिक्षणास पाठविता येईल.

(अ) उपरोक्त प्रशिक्षणासाठी संबंधित कर्मचाऱ्याने नजीकच्या 'विपश्यना' केंद्रामध्ये प्रवेश घेतलेला असावा.

(ब) प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळविला आहे. अशा कर्मचाऱ्यांना पुणे महानगरपालिका सेवाविनियम नियम क्रमांक : १०७ (३) अन्वये एका वेळी कमाल १४ दिवसांएवढी रजा मंजूर करता येईल.

(क) कर्मचाऱ्याला तीन वर्षातून एकदा व संपूर्ण सेवेच्या काळात सहा वेळा या प्रशिक्षणास पाठविता येईल.

(ड) कर्मचारी कामावर परत आल्यानंतर प्रशिक्षण पूर्ण केल्याचे संबंधित प्रशिक्षण केंद्राचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(इ) संबंधित सेवकाचे सेवापुस्तकात त्याप्रमाणे नोंद ठेवण्यात यावी.

हे आदेश दिनांक १५.१०.१९९९ पासून अंमलात येतील.

(सही)
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

प्रत : मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष),
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल),
मा. सर्व खातेप्रमुख
पुणे महानगरपालिका.

यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी ....